Impact Factor
5.307 (SJIF)

RESEARCH HUB
International Peer-Reviewed Multidisciplinary E-Journal

ISSN
2582-9173

# भारतातील अन्नसुरक्षा व भूकमरी चे अर्थशास्त्रीय अध्ययन

**प्रा. डॉ. अमोल गिरिधरराव आवंडकर**
अर्थशास्त्र विभाग प्रमुख
नूतन आदर्श कला,वाणिज्य व श्रीमती एम.एच. वेगड
विज्ञान महाविद्यालय उमरेड जिल्हा - नागपूर.

---

***सारांश :***

*भारतातील अन्न सुरक्षा व भूकमरीचे अर्थशास्त्रीय अध्ययन" या शोध निबंधाचे अध्ययन द्वितीय माहितीवर किंवा समकांवर आधारित असून शोधनिबंध लिखाणाकरिता विश्लेषणात्मक अध्ययन पद्धतीचा वापर केला आहे. प्रस्तुत शोध निबंधाची उद्दिष्टे पुढीलप्रमाणे आहेत.भारतातील अन्नधान्य उपलब्धते संबंधित माहितीचे अध्ययन करणे,भारतातील भूकमरी व भूकमरी संबंधित विविध समस्यांचे अध्ययन करणे,भारतातील भूकमरी व अन्नसुरक्षा संबंधित समस्यांचे अध्ययन करून त्यावर उपाययोजना सुचविणे,भारतातील अन्नसुरक्षते संबंधीत त्रुटी मधील विविध कारणांचे अध्ययन करून त्यावर आधारित माहिती चे अध्ययन करणे,भारतातील अन्नधान्याच्या पुरवठ्यावर परिणाम करणाऱ्या घटकांचे अध्ययन करणे इत्यादी ही शोध निबंधाची उद्दिष्ट्ये असून भारतात जगाच्या तुलनेत अधिक प्रमाणात भूकमरी ग्रस्त लोकसंख्या आहे,भारतात अन्नसुरक्षता संबंधी विविध समस्या,अडचणी आहेत,भारतात जगाच्या तुलनेत कुपोषण ग्रस्त लोकांचे प्रमाण अत्याधिक आहे,भारतात जगाच्या तुलनेत भुकमरी किंवा उपासमारीने मृत्यू मुखी पडणाऱ्यांची संख्या अधिक आहे ही या शोध निबंधाची गुहितके आहेत. प्रस्तुत शोध निबंधाच्या अध्ययनाद्वारे प्राप्त परिणामांवरून असे निदर्शनास आले की वरील सर्व गृहीतके अनुकूल सिद्ध झाली आहेत आणि या सर्व गृहीतकांचा स्वीकार करण्यात आला आहे.भारतातील अतिरिक्त लोकसंख्या आणि अन्नधान्यावरील ताण तसेच अन्य विविध कारणांमुळे भारतात भूकमरी संबंधी तसेच अन्नधान्य सुरक्षा संबंधी विविध अडचणी व दोष आढळून येत आहेत या सर्वांवर नियोजनबद्ध उपाय केल्याशिवाय तसेच क्रांतिकारक निर्णय घेऊन जोपर्यंत भारतातील लोक आणि सरकार एकत्र येऊन काम करत नाहीत तोपर्यंत ही समस्या सुटणे शक्य नाही म्हणून सर्वांनी एकत्र येऊन तसेच अन्नधान्याचे गांभीर्य लक्षात घेऊन नियोजनबद्ध कार्य करणे आवश्यक आहे.जागतिक भूकमरी निर्देशांक 2020 नुसार 117 देशांच्या यादीत भारताचा क्रमांक 94 वा आहे म्हणजेच भारतात भूकमरीची समस्या तीव्र स्वरूपात आहे. देशात राबविल्या जाणाऱ्या विविध योजनांची अंमलबजावणी अधिक प्रभावी पद्धतीने होणे आवश्यक आहे अन्यथा परिस्थिती अधिक गंभीर होऊ शकते असे निष्कर्षरूपाने दिसून येत आहे.*

---

**प्रस्तावना :**

आजही भारतातील जवळपास 14 टक्के लोकसंख्या कुपोषणाच्या जाळ्यात अडकून आहे एवढेच नव्हे तर पाच वर्षाखालील वय असणाऱ्या मुलांच्या मृत्यूचे प्रमाण 3.7% आहे आजही जगातील एक चतुर्थांश लोक भुकेच्या समस्येने ग्रस्त आहेत आणि जगात 90 कोटी लोक कुपोषित आहेत. भारत देश अन्नधान्याच्या बाबतीत सुजलाम सुफलाम असला तरी जगातील सर्वाधिक कुपोषित आणि अर्धपोटी लोक भारतातच राहतात हे मात्र सत्य

आहे. जगातील भूकमरी निर्देशांक (2020)च्या अहवालानुसार नेपाळ, श्रीलंका,पाकिस्तान,म्यानमार, बांलादेश, इंडोनेशिया हे देश भारतापेक्षा भुकमारी बाबत चांगल्या स्थितीमध्ये असल्याचे दर्शविले आहे मात्र भारताची परिस्थिती या देशांपेक्षा गंभीर असल्याचे या अहवालावरून लक्षात येते.असे असले तरी रवांडा,नायजेरिया,अफगाणिस्तान, लिबिया असे एकूण 13 देश भारताच्या मागे आहेत म्हणजेच तेथील परिस्थिती भूकमारी बाबत भारतापेक्षाही गंभीर आहे.भारताचा जागतिक भूकमारी निर्देशांकामध्ये (2020) 94 वा क्रमांक आहे. यावरून आपणास लक्षात येते की आपला देश अन्न धान्य बाबतीत सुजलाम सुफलाम असला तरि भुकमारी ही अतिशय गंभीर समस्या भारतात दिसून येत आहे. जगातील सर्वच देश असा विचार करतात की आपल्या देशातील सर्व लोकांना पुरेसे अन्नधान्य उपलब्ध करून देणे हे आपले प्रथम कार्य व कर्तव्य आहे त्याकरिता संबंधित देश आर्थिक नियोजन करून देशातील लोकांना पुरेशे अन्नधान्य उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न देखील करतात तसेच हे देश केवळ अन्नधान्य पुरवठा करण्यापर्यंतच थांबत नाहीत तर हेच अन्नधान्य देशातील गोरगरीब, शोषित, पीडित,वंचित अशा सर्वच घटकांपर्यंत पोहोचविण्याकरिता देखिल विशेष प्रयत्न करतांना दिसतात. देशात सामाजिक न्याय आणि लोकशाही टिकवून ठेवण्याकरिता देशातील संपूर्ण जनतेला अन्नधान्याची मुबलक प्रमाणात सोय उपलब्ध करून देणे हे प्रत्येक देशाचे आद्य कर्तव्यच ठरते म्हणून प्रत्येक देश याकरिता प्रयत्नशील असते.असे असले तरी जगातील अनेक देशात भूकमरी व कुपोषण अशा प्रकारच्या समस्या दिसून येतात म्हणून "भारतातील अन्नसुरक्षा व भूकमरी चे अर्थशास्त्रीय विश्लेषण" हा विषय शोध निबंध लिखाणाकरिता घेण्यात आला आहे.ज्यावरून आपणास भारतातील अन्नसुरक्षा व भारतातील भूकमरी संबंधी प्रत्यक्ष परिस्थितीचे चित्र आणि वास्तविकता समजण्यास मदत होईल. सोबतच आपल्याला या समस्यांमधून बाहेर पडण्याकरिता आवश्यक असणाऱ्या उपाययोजनांचा देखील उहापोह प्रस्तुत शोध निबंधामध्ये करता येईल आणि भारताला भूकमरी व कुपोषण यासारख्या भयानक व गंभीर समस्या किंवा आजारांपासून दूर ठेवण्यास मदत होईल.

**संशोधन पद्धती :**

प्रस्तुत शोध निबंधाचा विषय "भारतातील अन्नसुरक्षा व भूकमरी चे अर्थशास्त्रीय अध्ययन." हा असून हा शोध निबंध संपूर्णता द्वितीय सामग्री किंवा माहिती संग्रहणावर आधारित असून शोध निबंध लिखाणाकरिता वर्णनात्मक किंवा विश्लेषणात्मक अध्ययन पद्धतीचा वापर करण्यात आला आहे.प्रस्तुत शोध निबंधाची उद्दिष्टे व गृहीतके पुढीलप्रमाणे घेण्यात आलेली आहेत.

**शोध निबंधाची उद्दिष्टे :**

प्रस्तुत शोध निबंधाची उद्दिष्टे खालील प्रमाणे घेण्यात आलेली आहेत.

१) भारतातील अन्नधान्य उपलब्धते संबंधित माहितीचे अध्ययन करणे.

२) भारतातील भूकमरी व भूकमरी संबंधित विविध समस्यांचे अध्ययन करणे.

३) भारतातील भूकमरी व अन्नसुरक्षा संबंधित समस्यांचे अध्ययन करून त्यावर उपाययोजना सुचविणे.

४) भारतातील अन्नसुरक्षते संबंधी विविध कारणांचे अध्ययन करून त्यावर आधारित माहिती चे अध्ययन करणे.

५) भारतातील अन्नधान्याच्या पुरवठ्यावर परिणाम करणाऱ्या घटकांचे अध्ययन करणे.

**शोध निबंधाची गृहीतके:**

प्रस्तुत शोध निबंधाची गृहीतके पुढील प्रमाणे आहेत.

Research Hub International Journal

१) भारतात जगाच्या तुलनेत अधिक प्रमाणात भूकमरी ग्रस्त लोकसंख्या आहे.

२) भारतात अन्नसुरक्षता संबंधी विविध समस्या,अडचणी आहेत.

३) भारतात जगाच्या तुलनेत कुपोषण ग्रस्त लोकांचे प्रमाण अत्याधिक आहे.

४) भारतात जगाच्या तुलनेत उपासमारीने मृत्यू मुखी पडणाऱ्यांची संख्या अधिक आहे.

**शोध निबंधा संबंधित माहितीचे विश्लेषण :**

प्रस्तुत शोध निबंध लिखनाकरिता द्वितीय सामग्री किंवा माहिती संग्रहित करून या ठिकाणी माहितीचे विश्लेषण अधिक सखोल आणि विस्तृत स्वरूपात करण्यात आले आहे. सर्वप्रथम अन्न सुरक्षा संबंधी भारतात आढळून येणाऱ्या विविध समस्या,अडचणी आणि दोषांचे विश्लेषण पुढील प्रमाणे स्पष्ट करता येईल.

**अन्न धान्य किंमत वाढीची कारणे:**

अन्नधान्य किंमत वाढीची कारणे पुढील प्रमाणे आहेत.

**1)आधुनिकीकरणामुळे शहरीकरणात झालेली वाढ:**

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारतात औद्योगीकरणाला अधिक चालना देण्यात आली त्यामुळे औद्योगीकरण झपाट्याने होऊ लागले त्याचाच परिणाम म्हणजे शहरीकरण देखील मोठ्या प्रमाणात होण्यास सुरुवात झाली त्यामुळेच शहरी भागातील लोकांचे उत्पन्न देखील मोठ्या प्रमाणात वाढण्यास सुरुवात झाली याचाच परिपाक म्हणजे लोकांनी मोठ्या प्रमाणात अन्नधान्याच्या मागणीत वाढ केली ज्यामुळे या अन्नधान्याच्या किमतीत मोठ्या प्रमाणात वाढ झाल्याची दिसून येते.

**2) देशाच्या लोकसंख्येत झालेली अतिरिक्त वाढ:**

भारत स्वातंत्र्य झाला तेव्हा जवळपास 1951 मध्ये भारताची एकूण लोकसंख्या 36.1 कोटी होती ती वाढत जाऊन 1991 मध्ये 85 कोटी झाली म्हणजेच भारताच्या लोकसंख्या वाढीचा दर 2.5 टक्के होता याचा अर्थ भारताच्या लोकसंख्येत भरमसाठ वाढ झालेली दिसून येते एवढेच नाही तर आजची परिस्थिती अतिशय भयावह आहे ज्यामुळे आपल्या लक्षात येते की भारतातील एकूण लोकसंख्या 140 करोडच्या वर गेली आहे ज्यामुळे जगात भारत लोकसंख्येच्या बाबतीत चीनला मागे टाकत प्रथम स्थानावर आला आहे. यावरून स्पष्ट होते की भारतातील लोकसंख्या झपाट्यांना वाढली आहे सहाजिकच एवढ्या मोठ्या प्रमाणात वाढलेल्या लोकसंख्येला स्वतःचे जीवन जगण्याकरिता अन्य धान्याची नितांत आवश्यकता असणे स्वाभाविक आहे म्हणून वाढलेल्या लोकसंख्येमुळे अन्नधान्याची देखील मागणी मोठ्या प्रमाणात वाढलेली दिसते ज्यामुळे अन्नधान्याच्या तुलनेत लोकसंख्या अधिक झाल्याने अन्नधान्याच्या किमतीत मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे.

**3) लोकांच्या उत्पन्नात झालेली वाढ:**

औद्योगीकरण,शहरीकरण, नियोजन, गुंतवणूक इत्यादी अनेक कारणांमुळे लोकांच्या हाताला काम मिळाले ज्यामुळे लोकांच्या उत्पन्नात मोठ्या प्रमाणात वाढ झाल्याची दिसून येते लोकांचे उत्पन्न वाढल्यामुळे लोकांनी मोठ्या प्रमाणात अन्नधान्याच्या मागणीत देखील वाढ केली ज्यामुळे अन्नधान्याच्या किमती झपाट्यांना वाढण्यास सुरुवात झाली.

**4) स्वातंत्र्यानंतर नियोजनाकरिता गुंतवणुकीतील वाढ:**

भारतात 1951 मध्ये सर्वप्रथम पहिली पंचवार्षिक योजना सुरू करण्यात आली तेव्हापासून तर आज पर्यंत अनेक पंचवार्षिक योजनांच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणात गुंतवणुकीत वाढ झाली ज्यामुळे सार्वजनिक क्षेत्राच्या

माध्यमातून होणाऱ्या गुंतवणुकीचे परिणाम संपूर्ण अर्थव्यवस्थेवर झाल्याचे दिसून येते. स्वाभाविकच गुंतवणुकीत झालेल्या वाढीमुळे लोकांच्या उत्पन्नात वाढ होऊन लोकांच्या राहणीमानात मोठ्या प्रमाणात बदल झाला ज्यामुळे लोकांची अन्नधान्य करत असणारी मागणी दिवसेंदिवस वाढतच गेली त्याचा परिणाम अन्नधान्याच्या किमतीवर होऊन अन्नधान्याच्या किमती पूर्वीपेक्षा अधिक वेगाने वाढण्यास सुरुवात झाली असे अध्ययना द्वारे प्राप्त परिणामांवरून निदर्शनास येते.

**5) अन्नधान्याची साठवणूक:**

वाढीव अन्नधान्याच्या किमतीचा फायदा आपल्याला झाला पाहिजे म्हणून बहुतांश व्यापाऱ्यांनी मोठ्या प्रमाणात अन्नधान्याची पाठवणूक केली ज्यामुळे अर्थव्यवस्थेत अन्नधान्याची तूट निर्माण झाली परंतु अन्नधान्य करता असणारी मागणी मात्र वाढतच गेली अन्नधान्य मोठ्या प्रमाणात उपलब्ध असल्यानंतरही केवळ मोठ्या प्रमाणात नफा कमवण्याकरिता मोठ्या व्यापाऱ्यांनी एवढेच नव्हे तर किरकोळ व्यापाऱ्यांनी देखील अन्नधान्याची साठवणूक आपल्या अन्नधान्याच्या गोदामात केली ज्यामुळे या अन्नधान्याच्या किमती मोठ्या प्रमाणात अधिक वेगाने वाढत गेल्या. साधारणतः अन्नधान्याचा कोणताही घाऊक किंवा ठोक व्यापारी अन्नधान्याची आपल्याजवळ साठवणूक करून अतिरिक्त नफा कमवण्याची सर्वसाधारण प्रवृत्तीच यांच्यामध्ये दिसून येते ज्यामुळे नेहमीच अशा अन्नधान्य साठवणुकीमुळे सर्वसाधारण गरीब मागास शोषित पीडित जनतेला याचे प्रतिकूल परिणाम भोगावे लागतात ते परिणाम म्हणजे वाढीव किंमत अन्नधान्या करता द्यावी लागते अन्यथा अन्नधान्य मिळण्यापासून वंचित राहावे लागते ज्यामुळे त्यांच्यावर उपासमारीची किंवा भूक मरीची वेळ येते.

**6) पैशाच्या परिमाणातील वाढ :**

साधारणता असे दिसून येते की स्वतंत्र नंतर तर आजपर्यंत पैशाच्या पुरवठ्यात मोठ्या प्रमाणात वाढ करण्यात आली आहे जेणेकरून लोक आपले आर्थिक व्यवहार सुरळीत व व्यवस्थित पार पाडू शकतील परंतु पैशाचा पुरवठा करताना मात्र अन्नधान्याच्या उपलब्धतेचा विचार करण्यात आला नाही ज्यामुळे लोकांजवळ पैशाचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढले मात्र त्या तुलनेत अन्नधान्याच्या उत्पादनात वाढ झालेली दिसून येत नाही ज्यामुळे कमी अन्नधान्यासाठी देखील लोक जास्त पैसा सहज देण्यास तयार होतात याचाच परिपाक म्हणजे अन्नधान्याच्या किमतीत मोठ्या प्रमाणात वाढ होणे होय अन्नधान्याच्या किमतीत वाढ झाल्यामुळे गरीब जनतेवर त्याचा प्रतिकूल परिणाम होऊन भुकमरीसारखी समस्या निर्माण झाली आहे.

**7) सरकारी अंदाजपत्रकाचा परिणाम :**

प्रत्येक वर्षी सरकार आपले अंदाजपत्रक सादर करते या अंदाजपत्रकात पुढील वर्षात सरकारच्या माध्यमातून होणाऱ्या कामाचा लेखाजोखा असतो एवढेच नव्हे तर येणाऱ्या वर्षात सरकार किती पैसा खर्च करणार आणि सरकारला विविध घटकांच्या माध्यमातून किती उत्पन्न मिळेल याचा देखील अंदाजपत्रकात लेखाजोखा असतो ज्यामुळे आपणास येणाऱ्या वर्षात सरकारची भूमिका लक्षात येते साधारणता दरवर्षी सरकार आपल्या खर्चात वाढ करत राहते परंतु त्या तुलनेत सरकारला मिळणारे उत्पन्न मात्र वाढत नाही ज्यामुळे सरकार खर्च करण्याकरिता कर्ज घेते ज्याला आपण तुटीचा अर्थभरणा असे देखील म्हणतो त्रुटीचा अर्थभरणा केल्यामुळे अर्थव्यवस्थेत पुन्हा नवीन पैसा येतो ज्यामुळे अर्थव्यवस्थेतील पैशाचे प्रमाण पहिल्या च्या तुलनेत अधिक वाढते मात्र अन्नधान्य उत्पादन मात्र एवढ्या झपाट्याने वाढणे शक्य नसते किंवा वाढत नाही ज्यामुळे अर्थव्यवस्थेत अन्नधान्याचे उत्पादन कमी व पैशाचे प्रमाण जास्त अशी स्थिती निर्माण होते त्याचा परिणाम अन्नधान्याच्या किमती

पुन्हा वाढण्यावर होते म्हणजेच तुटीचा अर्थभरणा केल्यामुळे देखील अन्नधान्याच्या किमतीत भरमसाठ वाढ होतांना दिसून येते.

**ब) अन्नधान्याचे उत्पादन व पुरवठ्याचे निर्धारक घटक :**

भारतातील अन्नसुरक्षा व भूकमारी संबंधित विविध घटकांचे अध्ययन करतांना केवळ अन्नधान्याच्या मागणीचा विचार करून चालणार नाही म्हणून या ठिकाणी अन्नधान्याच्या पुरवठ्यावर व उत्पादनावर परिणाम करणाऱ्या विविध निर्धारक घटकांचे अध्ययन करणे देखील महत्त्वपूर्ण आहे. कारण अन्नधान्याच्या किमती केवळ अन्नधान्याच्या मागणीवर अवलंबून राहत नाही तर मागणी सोबतच त्या अन्नधान्याचे उत्पादन व अन्नधान्याचा होणारा पुरवठा यावर देखील तेवढ्याच निर्भर असतात म्हणून प्रस्तुत शोध निबंधात अन्नधान्याच्या उत्पादनावर व पुरवठ्यावर परिणाम करणारे घटक किंवा निर्धारक घटक पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येतील.

**१) अन्नधान्याची नासधूस किंवा नासाडी :**

अन्नधान्याचे उत्पादन व अन्नधान्याचा पुरवठा यावर परिणाम होणाऱ्या महत्त्वपूर्ण घटकांपैकी एक घटक म्हणजे दरवर्षी अन्नधान्याची होणारी नासाडी किंवा नासधूस. आपणास माहिती आहे की जेव्हाही अन्नधान्याचे उत्पादन घेतले जाते तेव्हा या अन्नधान्याच्या उत्पादन प्रक्रियेत व वाहतूक प्रक्रियेत तसेच विक्री प्रक्रियेत अनेक प्रकारच्या त्रुटी असल्यामुळे अन्नधान्याची प्रत्येक ठिकाणी नासाडी होताना दिसून येते ज्यामुळे अन्नधान्य खराब होऊन अन्नधान्याची मात्रा किंवा परिमाण यावर यांचा विपरीत परिणाम होताना दिसून येते म्हणून उत्पादन प्रक्रियेत तसेच वाहतूक प्रक्रियेत व विक्री प्रक्रियेत होणाऱ्या विविध घडामोडीमुळे उत्पादन व विक्री यावर प्रतिकूल परिणाम होऊन त्याच्यामुळे अन्नधान्याच्या किमतीत मोठ्या प्रमाणात वाढ झाल्याचे दिसून येते ज्यामुळे गरीब लोकांना म्हणाव तेवढ्या प्रमाणात अन्नधान्य खरेदी करता येत नाही.

**२) प्रतिकूल अन्नधान्य विक्री व्यवस्था :**

भारतात विविध राज्यांमध्ये किंवा क्षेत्रांमध्ये अन्नधान्याच्या वेगवेगळया प्रकारांचे उत्पादन घेतल्या जाते परंतु केवळ वाहतूक व्यवस्था किंवा विक्री व्यवस्था व्यवस्थित नसल्यामुळे एका ठिकाणी उत्पादित झालेली वस्तू सहज दुसऱ्या ठिकाणी नेऊन त्या ठिकाणी त्या वस्तूची विक्री करण्यास अनेक अडचणी व समस्या जाणवतात ज्यामध्ये वाहतूक खर्च,योग्य रस्ते, वाहतुकीच्या विविध प्रकारच्या साधनांचा अभाव इत्यादी मुळे विक्री व्यवस्थेत अनेक प्रकारचे दोष आढळून येतात ज्यामुळे अन्नधान्य मोठ्या प्रमाणात लोकांपर्यंत सहज पोहोचविणे शक्य होत नाही आणि स्थानिक लोकांना अन्नधान्याची मोठी किंमत मोजावी लागते व गरीब जनतेला हे अन्नधान्य खरेदी करणे महाग पडते तसेच त्यांच्यावर उपासमारीची किंवा भूकमरीची परिस्थिती निर्माण होते.

**3) अन्नधान्य उत्पादन वाढीचा प्रतिकूल दर :**

साधारणतः देशात अन्नधान्याचे उत्पादन एवढे घेतले जाते की तो देश अन्नधान्याच्या बाबतीत अन्य देशांवर निर्भर राहणार नाही आणि ज्यामुळेच त्या देशाची आत्मनिर्भर देश म्हणून ओळख निर्माण होते. एवढेच नाही तर जर देश अन्नधान्य देखील अन्य देशातून मागवत असेल तर संपूर्ण देश अन्य देशाच्या आर्थिक गुलामगिरीत जाऊ शकतो. देशातील लोकसंख्या वाढीचा दर आणि देशातील अन्नधान्याच्या उत्पादन वाढीचा दर यात जर तफावत निर्माण झाल्यास त्यातही लोकसंख्या वाढीदरापेक्षा जर अन्नधान्य उत्पादन वाढीचा दर कमी असेल तर देश अन्य देशांवर अन्नधान्य बाबतीत निर्भर राहील. ज्यामुळे अंतर्गत देशात अन्नधान्याची टंचाई निर्माण होऊन अन्नधान्याच्या किमती मोठ्या प्रमाणात वाढतील व गरीब,आर्थिक दृष्ट्या मागास लोकांना अन्नधान्यांपासून वंचित

राहावे लागेल आणि त्यांच्यावर उपासमारी व भूकमारीची परिस्थिती निर्माण होऊ शकते.

**4) अन्नधान्याविषयी शासनाचे धोरण:**

वाढत्या लोकसंख्येला नियंत्रणात ठेवून मोठ्या प्रमाणात अन्नधान्याचे उत्पादन वाढविण्याकरिता शासन जर अग्रेसर असेल किंवा पुढाकार घेऊन प्रयत्नशील असेल तर देशात अन्नधान्याचा मोठ्या प्रमाणात पुरवठा वाढून किंवा उत्पादन वाढवून देशातील सर्व लोकांच्या अन्नधान्याच्या गरजेला सहज पूर्ण करता येते. परंतु जर देशात शासनातर्फे विशेष प्रयत्न करण्यात येत नसतील किंवा तशा प्रकारचे धोरण शासनाच्या मार्फत राबविले जात नसेल तर मात्र लोकसंख्या वाढ अधिक होऊन अन्नधान्याचे उत्पादन कमी होऊन किमती मोठ्या प्रमाणात वाढतील तसेच अन्नधान्याच्या किमतीवर देखील नियंत्रण ठेवून देशातील सर्व लोकांची अन्नधान्याची गरज पूर्ण करण्याकरिता शासन प्रयत्नशील असेल तर हे सहज शक्य होऊ शकते. शासनाचे अन्नधान्य विषयीची धोरणे जर कुचकामी असतील किंवा अन्नधान्याच्या बाबतीत गैरव्यवस्था निर्माण होत असेल किंवा अकार्यक्षम स्वरूपाची सार्वजनिक अन्नधान्य वाटप पद्धती असेल किंवा मोठ्या जमीनदारांकडून शासनावर मोठ्या प्रमाणात दडपण आणल्या जात असेल किंवा भ्रष्ट प्रशासन असेल तर अन्नधान्याच्या परिमाणात किंवा उत्पादनात टंचाई निर्माण होऊन त्याचा परिणाम असा होईल की अन्नधान्याच्या किमती निरंतर वाढत जातील ज्यामुळे भूकमरी व उपासमारीची परिस्थिती निर्माण होईल.

**5) सरकारचे अन्नधान्य विषयक आयात धोरण :**

कोणताही देश सर्वप्रथम आपल्या देशातील लोकांची अन्नधान्याची गरज पूर्ण करण्यावर जास्त भर देतो. त्यानंतरच उर्वरित अन्नधान्य अन्य देशांना निर्यात करण्याकरिता विचार करतो. परंतु जर देशाची गरज पूर्ण होत नसेल तर कोणताही देश अन्नधान्याची निर्यात करणार नाही परंतु जर एखादा देश अन्य देशांकडून अन्नधान्याची आयात करत असेल तर आयात धोरण हे सुलभ व सोयीचे असले पाहिजे जेणेकरून सहज अन्य देशांकडून आयात करता येईल परंतु वर्तमानकालीन स्थिती मात्र बिकट निर्माण झाली आहे साधारणतः असे दिसून येते की कोणताही देश अन्नधान्याची आयात करत असेल तर अन्य देशांकडून या देशावर मोठ्या प्रमाणात आर्थिक अटी व शर्ती लावून देशाचे आर्थिक शोषण केल्या जाते ज्यामुळे देशाचे सार्वभौमत्व धोक्यात येते. सोबतच असे दिसून येते की जागतिक स्तरावर परकीय देशांकडून सवलतीच्या दरात अन्नधान्य मिळणे आजच्या काळात कठीण व नुकसानीचे झाले आहे म्हणजेच अन्नधान्याची आयात पूर्वीपेक्षा अधिक कठीण,महाग व नुकसान दायक झाली आहे.

**6) अन्नधान्य व शेतकऱ्यांचा उदरनिर्वाह दृष्टिकोन :**

भारतात आजही असे दिसून येते की बहुतांश शेतकरी अन्नधान्याचे उत्पादन केवळ आपले कुटुंब किंवा परिवार यांच्या उदरनिर्वाह करिता करतांना दिसतात म्हणून अन्नधान्याचे उत्पादन म्हणाव तेवढे वाढलेले दिसत नाही जे काही उत्पादन मिळते ते शेतकरी स्वतःच्या कुटुंबाकरिता किंवा परिवारा करिता राखून ठेवतात ज्यामुळे बाजारात किंवा अन्य लोकांना अन्नधान्याचा पुरवठा कमी होऊन मोठ्या प्रमाणात अन्नधान्याची मागणी असल्यामुळे अन्नधान्याच्या किमती वाढतात आणि बहुतांश लोक आपली अन्नधान्याची दैनंदिन गरज पूर्ण करू शकत नाहीत ज्याचा परिणाम असा होतो की या लोकांवर उपासमारीची किंवा भुकमरी ची वेळ येते.

**क) अन्नधान्याचे उत्पादन व पुरवठा यातील त्रुटी दूर करण्याकरिता उपाययोजना :**

प्रस्तुत शोध निबंधामध्ये अन्नधान्याचे उत्पादन संबंधित विविध समस्या,अडचणी,दोष इत्यादी विषयी सविस्तर विश्लेषण करण्यात आले आहे. एवढेच नाही तर अन्नधान्याच्या किमती विषयी विविध कारणांचे देखील

सविस्तर विश्लेषण या शोध निबंधात करण्यात आले आहे आता आपणास या अन्नधान्याच्या उत्पादनात व पुरवठ्यात किंवा अन्नधान्याच्या किमतीतील अनेक त्रुटींवर उपाययोजना सुचवणे आवश्यक आहे जेणेकरून देशातील अन्नधान्याच्या उत्पादनात व पुरवठ्यात वाढ होऊन,अन्नधान्याच्या किमती कमी होऊन देशातील सर्वच लोकांची अन्नधान्य करिता असणारी मागणी किंवा गरज सहज पूर्ण करता येईल.त्यामुळे देशातील कोणत्याही व्यक्तीवर भुकमरी किंवा उपासमारीची वेळ येणार नाही.अन्नधान्य उत्पादन व पुरवठ्यातील तसेच अन्नधान्य किमतीतील विविध दोषांवर किंवा त्रुटींवर पुढील प्रमाणे उपाय योजना सुचविता येतील.

**1)आधुनिक पद्धतीने शेती :**

भारतातील लोकांची किंवा व्यक्तींची अन्नधान्याची गरज किंवा मागणी पूर्ण करण्याकरिता अन्नधान्याच्या उत्पादनात व पुरवठ्यात वाढ होणे आवश्यक आहे वाढ झाल्यास अन्नधान्याच्या किमतीत देखील मोठ्या प्रमाणात घट घडून येईल त्याकरिता सर्वप्रथम भारतात शेती आधुनिक पद्धतीने होणे आवश्यक आहे. भारतातील अन्नधान्य उत्पादनात वाढ करण्याकरिता सुधारित बी-बियाणे, सिंचनाच्या सुविधा,रासायनिक खते,जंतुनाशके,विविध औषधी, आधुनिक शेतीची अवजारे इत्यादी बाबींवर मोठ्या प्रमाणात लक्ष देऊन सुधारणा करणे व त्यातही मोठ्या प्रमाणात सिंचनाच्या सोयी उपलब्ध करणे जेणेकरून अन्नधान्याच्या उत्पादनात वाढ होण्यास मदत होईल साधारणतः भारतीय शेतकरी वर्ष भरात शेतीमधून एकच पीक घेताना दिसते शेतकऱ्यांना वरील विविध सोई-सुविधा उपलब्ध करून दिल्यास शेतीच्या उत्पादनात क्रांतिकारक बदल होऊन मोठ्या प्रमाणात अन्नधान्याच्या उत्पादनात वाढ होण्यास मदत होईल. प्रत्येक शेतकऱ्याने आधुनिक शेती पद्धतीचा वापर करावा त्याकरिता समाज व शासनाने शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणात मदत व सहकार्य करावे.

**2) शेतकऱ्यांकरिता शिक्षण व प्रशिक्षण केंद्र :**

भारतीय शेतकरी हा शेती सबंधित शिक्षित नसल्यामुळे किंवा शेतीसंबंधी आधुनिक नवीन नवीन प्रयोग किंवा संशोधन शेतकऱ्यांपासून लांब असल्याचे दिसून येते असल्याने भारतीय शेतकऱ्यांना शिक्षण देण्याकरिता व त्यांना आधुनिक पद्धतीने शेती करण्याकरिता प्रशिक्षित करण्यात करण्याकरीता त्यांच्याकरीता देशात विविध ठिकाणी शेतकरी शेती विषयक शिक्षण व शेतीसंबंधी प्रत्यक्ष विविध प्रकारचे प्रशिक्षण देण्याकरिता संपूर्ण देशात मोठ्या प्रमाणात शिक्षण व प्रशिक्षण केंद्र सुरू करण्यात यावीत जेणेकरून आधुनिक पद्धतीने शेती करून देशात मोठ्या प्रमाणात अन्नधान्याचे उत्पादन घेता येईल आणि देशातील लोकांची अन्नधान्य करीता असणारी मागणी किंवा लोकांची अन्नधान्याची गरज सहज पूर्ण करता येईल त्यामुळेच अन्नधान्याची किंमत देखील नियंत्रण राहील तथा देशातील सर्वच व्यक्ती अन्नधान्य सहज खरेदी करू शकतील.

**3) अन्नधान्य सुदृढ वितरण व्यवस्था:**

देशातील सर्व व्यक्तींना मुबलक प्रमाणात अन्नधान्याचा पुरवठा होण्याकरिता अन्नधान्य वितरणावर सरकारतर्फे विशेष लक्ष देण्यात आले पाहिजे जेणेकरून अन्नधान्याची प्रत्येक व्यक्तीची गरज पूर्ण करता येईल अन्नधान्याच्या बाबतीत घाऊक व्यापार व किरकोळ व्यापार यामध्ये सरकारने हस्तक्षेप करून अन्नधान्य किंमत व वितरण संबंधी विशेष निर्णय घेऊन सर्वसमावेशक अन्नधान्य वितरणावर लक्ष केंद्रित केले पाहिजे. अन्नधान्य वितरणाकरता संपूर्ण देशात गोदामांची व्यवस्था,योग्य वाहतूक व्यवस्था,अन्नधान्यांच्या योग्य किमती इत्यादी विषयी विस्तृत सोयी सुविधा शासनातर्फे उपलब्ध करून देण्यात आल्या पाहिजेत.ज्यामुळे देशातील जनतेला अन्नधान्याची गरज सहज पूर्ण करता येईल त्यामुळे कोणत्याही व्यक्तिवर उपासमारीची किंवा भूकमरीची वेळ येणार

Research Hub International Journal

नाही. अशाप्रकारे शासनाने विविध व्यवस्था निर्माण केल्यास अन्नधान्य वितरणातील त्रुटी दूर होऊन सर्वांना अन्नधान्य उपलब्ध होईल.

**4) अन्नधान्याच्या किमतीवर नियंत्रण:**

सरकारने देशातील अन्नधान्याच्या उत्पादनात वाढीबरोबरच या अन्नधान्याच्या किमतीवर देखील विशेष लक्ष देणे आवश्यक आहे.ज्यामुळे कमी किमतीत सर्व लोकांना अन्नधान्य उपलब्ध होईल. अन्नधान्याच्या किमतीत सतत चढउतार होताना दिसून येते म्हणून अन्नधान्याच्या किमती स्थिर कशा राहतील यावर देखील सरकारने विशेष लक्ष देणे आवश्यक आहे.अन्नधान्याची दीर्घकालीन किंमत धोरणाची आखणी करून त्याकरिता संपूर्ण अर्थव्यवस्थेत अन्नधान्याची किंमत स्थिर व दीर्घकाळपर्यंत व्यवस्थित ठेवून सर्वसामान्य लोकांना अन्नधान्य खरेदी करण्याकरिता कोणतीही अडचण येणार नाही याची दक्षता घेण्यात यावी. एवढेच नाही तर शेतीतील उत्पादित अन्नधान्याच्या किमतीत नेहमीच उतार चढाव दिसून येत असल्यामुळे शेतकरी देखील नाराज होतात व त्यांचे अर्थिक नुकसान होते ज्यामुळे शेतकरी हतोत्साहित होऊन शेतीतील उत्पादित अन्नधान्याच्या परिमाणावर किंवा मात्रेवर विपरीत परिणाम होऊ शकते म्हणून शेतकऱ्यांचे आर्थिक हित लक्षात ठेवूनच किंवा शेतकऱ्यांना नेहमीच मध्यस्थानी ठेवून अन्नधान्याच्या किमती निश्चित कराव्या.

**5) अन्नधान्य नासाडी वर उपाय :**

भारतात प्रतिवर्षी अन्नधान्याची नासाडी मोठ्या प्रमाणात होताना दिसतं ज्यामध्ये उंदीर,माकडे व अन्य प्राण्यांकडून तसेच कीटकांकडून मोठ्या प्रमाणात जवळपास दहा ते पंधरा टक्के अन्नधान्याची नासाडी होतांना दिसते.परिणामतः अन्नधान्याची मात्रा कमी होते म्हणून वरील सर्व समस्यांवर उपाय शोधून सरकारने तथा व्यापारी किंवा शेतकरी या सर्वांनी एकत्र येऊन यावर तोडगा काढून मोठ्या प्रमाणात नासाडी कशी थांबवता येईल यावर लक्ष केंद्रित केले पाहिजे.

**6) अन्नधान्य उत्पादन विषयक अनुकूल धोरण :**

भारतातील अन्नधान्याच्या उत्पादनात दिसून देणारी कमतरता किंवा अन्नधान्यांच्या किमतीतील मोठी वाढ यामागे शासकीय धोरण जबाबदार असल्याचे देखील दिसून येते.म्हणून भारतात अन्नधान्याचे उत्पादन वाढविण्याकरिता व अन्नधान्याच्या किमती नियंत्रणात ठेवण्याकरिता शासकीय धोरण हे अन्नधान्य वाढ व किमतीतील घट यावर विशेष लक्ष केंद्रित करून तयार करण्यात आले पाहिजे.जेणेकरून अन्नधान्याच्या उत्पादनात वाढ होईल व किमती नियंत्रणात राहतील.याकरिता अन्न विभागाची निर्मिती,अन्नधान्याच्या आकर्षक किमती एवढेच नव्हे तर अन्नविषयक अनुकूल धोरण आणि भारताच्या अन्न महामंडळाकडून अन्नधान्याच्या बाबतीत अनुकूल व्यवस्था निर्माण करणे तसेच पुरेशी व कार्यक्षम स्वरूपाची सार्वजनिक वितरण प्रणाली निर्माण करणे इत्यादींवर विशेष लक्ष केंद्रित केल्यास अन्नधान्याच्या उत्पादनात वाढ होऊन अन्नधान्याच्या किमती नियंत्रणात राहतील त्याकरिता शासनाने अन्नधान्य विषयक अनुकूल धोरण आखणे व त्याची तंतोतंत अंमलबजावणी करणे आवश्यक आहे.

**7) इतर उपाययोजना :**

भारतात अतिरिक्त लोकसंख्या असल्यामुळे जनतेची अन्नधान्याची गरज पूर्ण करण्यास सरकार कमी पडते किंवा लोकांची अन्नधान्याची मागणी पूर्ण करू शकत नाही.भारतात लोकसंख्या वाढीच्या दरापेक्षा अन्नधान्य उत्पादन वाढीचा दर जास्त असेल तरच उपासमारी किंवा भूकमरीची समस्या सोडविणे शक्य होईल अन्यथा

अन्नसुरक्षा कितीही केली परंतु लोकसंख्या वाढीवर नियंत्रण ठेवले नाही तर उपासमारी किंवा भूकमारी च्या जाळ्यातून भारत कधीही बाहेर पडणार नाही.या सोबतच अन्य व्यवसाय ज्यामधून लोकांची अन्नधान्याची गरज पूर्ण होऊ शकते जसे की दूध व्यवसाय,मच्छीमारी,फळबाग,सागरी अन्न इत्यादी अनेक क्षेत्रातून किंवा व्यवसायातून लोकांची अन्नाची गरज भागविली जाऊ शकते म्हणून वरील सर्व घटकांचा विचार करता असे लक्षात येते की अन्नधान्य कमी पडल्यास या क्षेत्रा मध्ये क्रांतिकारक उत्पादन घेऊन लोकांची भूक भागवली जाऊ शकते. हे देखील अन्नधान्याचेच क्षेत्र समजून या क्षेत्रातील उत्पादन वाढीवर मोठ्या प्रमाणात भर देण्यात यावा.

अशाप्रकारे वरील विविध प्रकारच्या उपायांचा वापर करून देशातील अन्नधान्य उत्पादन वाढू शकते तसेच अन्नधान्य ची किंमत कमी केली जाऊ शकते व अन्नधान्य पुरवठा व्यवस्थित करुन या उपययोजना द्वारे आपणास देशातील भुकमारी किंवा उपासमारी दुर करता येईल.

**गृहितकांचे परीक्षण:**

प्रस्तुत शोध निबंध "भारतातील अन्नसुरक्षा व भूकमरीचे अर्थशास्त्रीय अध्ययन" यामध्ये काही गृहीतके घेऊन अध्ययन करण्यात आले व अध्ययनाद्वारे प्राप्त परिणामांवरून ही गृहीतके सत्य किंवा असत्य तसेच अनुकूल किंवा प्रतिकूल आहेत ही पडताळणी करून स्पष्ट करणे क्रमप्राप्त आहे.शोध निबंधातील गृहीतकांचे परीक्षण केल्यानंतर प्राप्त परीणाम खालील प्रमाणे आहेत.

**१) भारतात जगाच्या तुलनेत अधिक प्रमाणात भूकमरी ग्रस्त लोकसंख्या आहे :**

अध्ययनाव्दारे प्राप्त परिणामावरून असे निदर्शनास येते की भारतात जगाच्या तुलनेत अधिक प्रमाणात भूकमरी ग्रस्त लोकसंख्या आहे म्हणून या गृहितकाचा स्वीकार करण्यात येत आहे.

**२) भारतात अन्नसुरक्षता संबंधी विविध समस्या,अडचणी आहेत :**

अध्ययनाव्दारे प्राप्त परिणामावरून असे निदर्शनास येते की भारतात अन्नसुरक्षता संबंधी विविध समस्या,अडचणी आहेत म्हणून या गृहितकाचा स्वीकार करण्यात येत आहे.

**३) भारतात जगाच्या तुलनेत कुपोषण ग्रस्त लोकांचे प्रमाण अत्याधिक आहे :**

अध्ययनाव्दारे प्राप्त परिणामावरून असे निदर्शनास येते की भारतात जगाच्या तुलनेत कुपोषण ग्रस्त लोकांचे प्रमाण अत्याधिक आहे म्हणून या गृहितकाचा स्वीकार करण्यात येत आहे.

**४) भारतात जगाच्या तुलनेत उपासमारीने मृत्यू मुखी पडणाऱ्यांची संख्या अधिक आहे :**

अध्ययनाव्दारे प्राप्त परिणामावरून असे निदर्शनास येते की भारतात जगाच्या तुलनेत उपासमारीने मृत्यू मुखी पडणाऱ्यांची संख्या अधिक आहे म्हणून या गृहितकाचा स्वीकार करण्यात येत आहे.

**निष्कर्ष :**

भारत हा जगातील सर्वाधिक लोकसंख्या असणारा देश आहे कारण भारतात जगातील सर्वात जास्त लोकसंख्या वास्तव्य करत आहे.आज भारताची लोकसंख्या 140 करोड पेक्षा जास्त झाली आहे म्हणजेच लोकसंख्येच्या बाबतीत भारताने चीनला देखील मागे टाकले व जगात सर्वाधिक लोकसंख्या असणारा देश म्हणून भारत ओळखला जाऊ लागला आहे.भारतातील मोठ्या प्रमाणात असणारी लोकसंख्या व त्यांच्या भुकेचा प्रश्न किंवा जीवन निर्वाह चालविण्याकरिता आवश्यक असणाऱ्या अन्नधान्य उत्पादनाचा प्रश्न या ठिकाणी निर्माण होणे क्रमप्राप्त आहे.या भयावह स्थितीमुळे भारतात उपासमारी किंवा भूकमारी ही मोठी समस्या निर्माण झाली. ज्यामुळे भारतात जगातील सर्वाधिक भुकमरी किंवा उपासमारी ने मरणाऱ्या लोकांची संख्या असल्याचे दिसून आले



Research Hub International Journal

आहे.भारतात लोकसंख्या नियंत्रण करून तथा अन्नधान्याच्या उत्पादनात वाढ करूनच ही समस्या सोडविल्या जाऊ शकते तसेच अन्नधान्य वितरण व्यवस्थेत बदल करून,अन्नधान्याच्या किमती स्थिर ठेवून,शेतकऱ्यांना शेती विषयी शिक्षण व प्रशिक्षण देऊन,अन्नधान्याबद्दल केवळ शेतीवर अवलंबून न राहता अन्य व्यवसाय किंवा क्षेत्रांवर देखील लक्ष केंद्रित करणे इत्यादी अनेक उपायांद्वारे आपण भारतातील भूकमरीची किंवा उपासमारीची समस्या दूर करण्यास प्रयत्न करू शकतो एवढेच नाही तर या व्यतिरिक्त शेतकरी,जनता व सरकार या सर्वांनी एकत्रित येऊन लोकसंख्या नियंत्रण व अन्नधान्य उत्पादन यावर काम केल्यास ही समस्या सहज सोडवल्या जाऊ शकते. प्रस्तुत शोध निबंधात करण्यात आलेल्या अध्ययनाद्वारे प्राप्त परिणामांवरून असा निष्कर्ष निघते की भारतात अन्नसुरक्षा असून देखील मोठ्या प्रमाणात भूकमारी किंवा उपासमारी मुळे मरणाऱ्या लोकांची संख्या अन्य देशांच्या तुलनेत खूप जास्त आहे ही प्रतिकूल परिस्थिती असताना देखील आशेचा एक किरण म्हणजे जनतेने,सरकारने तसेच विशेष करून शेतकऱ्यांनी या समस्येचे निवारण करण्याकरिता एकजुटीने सखोल व विस्तृतपणे कार्य करणे क्रमप्राप्त व अनिवार्य आहे असे निष्कर्ष रूपाने या ठिकाणी सांगणे आवश्यक असून परिस्थिती भयावह आहे हे देखील सत्य या शोध निबंधाच्या अध्ययना द्वारे प्राप्त परिणामांवरून दिसून आलेले आहे हे देखील नाकारता येत नाही.

**संदर्भ सुची :**


- डॉ.प्रदिप आगलावे-संशोधन पद्धती,विद्या प्रकाशन- नागपूर.(२००८)
- डॉ.पु.ल.भांडारकर-सामाजिक संशोधन पद्धती,जानेवारी-१९८१.
- मिश्र-पुरी-भारतीय अर्थव्यवस्था (२०११) हिमालय प्रकाशन,दिल्ली.
- डॉ.देसाई,भारतीय अर्थव्यवस्था-निराली प्रकाशन.
- श्री.मुकुंद महाजन-भारतीय व जागतिक आर्थिक विकास- नीराली प्रकाशन.
- डॉ.सुधाकर शास्त्री-भारतीय अर्थव्यवस्था-विश्व पब्लिशर्स कंपनी, नागपूर.
- दत्त सुंदरम-भारतीय अर्थव्यवस्था-एस. चंद अँड कंपनी लि. नवी दिल्ली.
- डॉ. सुधीर बोधनकर-सामाजिक लेखांकन पद्धती-साईनाथ प्रकाशन, नागपूर.
- डॉ. वसुधा पुरोहित-पर्यावरणाचे अर्थशास्त्र-विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद.
- डॉ. बी. के. झिंगन-पर्यावरणाचे अर्थशास्त्र-वृंदा पब्लिकेशन, दिल्ली.


Research Hub International Journal